# सातारा जिल्हा परिषद
## ग्राम पंचायत विभाग
## राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान

जा.क्र./ग्रा.पं.-९/रा.अं.अ.दौरा/दरपत्रक/ ५७२ /२०१८
ग्रामपंचायत विभाग,
जिल्हा परिषद सातारा
दि.११/ १ /२०१८.

**विषयः- खाजगी वाहन भाडे तत्वावर घेणेसाठी जाहीर दरपत्रक सूचना**

सातारा जिल्हा परिषद, ग्रामपंचायत विभाग राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान अंतर्गत जिल्हा परिषदेमधील अंदाजे ४० पदाधिकारी/अधिकारी/कर्मचारी यांचा कोकण महसूल विभागातील सिंधूदूर्ग जिल्ह्यातील विविध ग्रामपंचायतींना भेटी देण्याकरीता दि.२२/०१/२०१८ ते २५/०१/२०१८ या कालावधीत अभ्यास दौरा आयोजित करणेत आला आहे. सदर अभ्यास दौऱ्यामध्ये अंदाजे **९५० कि.मी** इतका प्रवास अपेक्षित असून त्याकरीता स्थानिक बस सेवा पूरवठादार यांचेकडून खालील प्रमाणे दरपत्रके मागविणेत येत आहेत.

***<u>दरपत्रकाचा विहीत नमुना</u>***

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | दर प्रति कि.मी. | परमिट दर |
|---|---|---|---|
| १ | Non-AC Travel- 40 Seats | | |
| २ | AC Travel-40 Seats | | |
| ३ | Sleeper AC Travel -40 Seats | | |

वरीलप्रमाणे दरपत्रक **दिनांक १९/०१/२०१८ रोजी दुपारी १२.०० वा.** पर्यंत समक्ष अथवा पोस्टाने पोहोच होईल, अशा पध्दतीने सादर करावे, विहीत मुदतीत व वेळेत प्राप्त होणारी दरपत्रके, स्विकारली जातील. तद्नंतर प्राप्त होणारी दरपत्रके स्विकारली जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी. तरी वरीलप्रमाणे विहीत नमुन्यात दरपत्रक सादर करावे.

प्राप्त दरपत्रके **दिनांक १९/०१/२०१८ रोजी सायं ४.०० वा.** पुरवठादाराचे समक्ष उघडणेत येतील.

***दरपत्रकाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे –***

१) सदर दरपत्रक सुचना सातारा जिल्हा परिषदेच्या वेबसाईट www.zpsatara.gov.in वर उपलब्ध आहे.
२) पुरवठादाराने त्याचे दरपत्रक सादर करताना त्याबरोबर संबंधित कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहेत.
३) दरपत्रकात दिनांक व पुरवठादराची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. तसेच दरपत्रकात खाडाखोड नसावी.
४) एक किंवा सर्व दरपत्रके मंजूर/नामंजूर करणेचा अधिकार खाली सही करणार यांना राखून ठेवला आहे.
५) मंजूर दरानुसार दरपत्रक मंजुरीनंतर अभ्यासदौऱ्यासाठी मागणीनुसार बससेवा पुरवठा करणेस संबंधित पुरवठादारास बंधनकारक राहील.
६) दरपत्रकासोबत खालीलप्रमाणे कागदपत्र सादर करावीत.

- वाहनाचे आर.सी. बुक व टी. सी. बुक
- वाहनाची संपूर्ण विमा पॉलीसी
- वाहन चालकाचा परवाना

Scanned by CamScanner

- वाहनाचे पी.यु.सी. प्रमाणपत्र इ. सर्व कागदपत्रांच्या मुळ प्रती छायांकीत करुन त्या सत्यप्रतीसह सादर करावेत.
- वाहन उत्पादक वर्ष २०१३ अथवा तद्‌नंतरचे असल्यास पुरवठाधारक दरपत्रक भरणेस पात्र आहे. तसा पुरावा सोबत जोडावा.
- वाहनाच्या प्रवासी वाहतूक परवान्याची प्रत सोबत जोडणे आवश्यक आहे.

७) पुरवठादाराने सुचित केलेले दर हे सर्व करांसहीत असावेत. दरपत्रकामध्ये नमूद केलेल्या दरांव्यतिरिक्त अन्य कोणतीही जादा रक्कम या कार्यालयाकडून आदा केली जाणार नाही.

८) वाहनाची मालकी/वाहन वापरण्याचा अधिकार सिध्द करू शकणाऱ्या वाहनधारकांनीच दरपत्रक भरणे आवश्यक राहील.

९) वाहनाचे केंद्रीय मोटर वाहन अधिनियमानुसार आवश्यक ते रजिस्ट्रेशन (नोंदणी), सर्व कर, विमा, परवाने, वाहन सक्षमता प्रमाणपत्र (Fitness Certificate), प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र (PUC), वाहनचालकाचा गणवेश याबाबतच्या नियमांचे पालन करण्याची जबाबदारी वाहनधारकाची असून याबाबचे कोणतेही दायित्व अथवा जबाबदारी या कार्यालयाची (सातारा जिल्हा परिषदेची) असणार नाही.

१०) वाहन भाड्याने दिल्यानंतर सदर वाहनावरील इंधन, वंगण, दुरूस्ती, वाहन चालक यांचे वेतन व भत्ते इ. अदा करणेची जबाबदारी वाहन धारकाची राहील. तसेच वाहनाच्या प्रवासाचे वेळी भरावा लागणारा टोल आकार, पार्कींग चार्जेस इ. खर्च वाहन धारकाने त्या त्या वेळी स्वत: करणेचा आहे.

११) कोणत्याही परिस्थितीत वाहन नादुरूस्त असल्यास अथवा वाहन चालक सेवा पूरविणेस असमर्थ असलेस त्याऐवजी पर्यायी व्यवस्था वाहनधारकाने विनाविलंब कोणताही जादा मोबदला न मागता करणेची आहे.

१२) यापूर्वी कामाचा अनुभव असल्यास व वाहन सातारा जिल्हा पासिंगचे असल्यास प्राधान्याने विचार करणेत येईल. तथापि, फोटो प्रत पुरावा आवश्यक आहे. तसेच लघुत्तम निविदा दर मंजूर होणे आवश्यक आहे.

१३) वाहन पुरवठादाराकडून वाहन सेवेबद्दलचे देयकातून योग्स ते आयकर व सेवाकर विहीत अधिनियमानुसार कपात करून घेतले जातील.

१४) वाहन पुरवठादाराची सेवा वाढविण्याचा अथवा कमी करण्याचा अधिकार या कार्यालयाने राखून ठेवलेला आहे.

१५) सदर निविदेचा प्रक्रियेत कायदेशीर वाद विवाद निर्माण झालेस त्याबाबतचे कार्यक्षेत हे सातारा जिल्हा न्यायालय राहील.

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.)**
**जिल्हा परिषद सातारा**

प्रतः- कार्यालयीन नोटीस बोर्डावर प्रसिध्दीसाठी

Scanned by CamScanner